# एकदा तरी...

घुटमळलो वाटेत, पाऊलखुणा त्या माझ्या
पाहून घे; एकदा तरी ॥ १ ॥

खुण आणली चाफा, तू गंध त्याचा
माळून घे; एकदा तरी ॥ २ ॥

पाहिली वाट तुझी, त्या नजरा थकलेल्या
जाणून घे; एकदा तरी ॥ ३ ॥

झुरलो आठवणीत, क्षण किती तया
मोजून ये; एकदा तरी ॥ ४ ॥

प्रतीक्षेत लिहिल्या ओळी, किती त्या
ऐकून घे; एकदा तरी ॥ ५ ॥

ते टाकलेले पत्र माझे, घरी तुझ्या
निरखून घे; एकदा तरी ॥ ६ ॥

सांज व्यर्थ, श्वास भारले विना तुझ्या
स्पंदून घे; एकदा तरी ॥ ७ ॥

बोललो नवस तू येण्यास, किती देवास
विचारून ये; एकदा तरी ॥ ८ ॥

दिवस किती आहेस, रागात तो
टाकून ये; एकदा तरी ॥ ९ ॥

www.saarthbodh.com
www.saarthbodh.com
www.saarthbodh.com

© सचिन पु. कुलकर्णी
www.saarthbodh.com
FB ID - sachin.kulkarni78